महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र
७०८ सदाशिव पेठ, कुमठेकर मार्ग, पुणे ४११०३०
संपर्क क्रमांक (०२०) २४४७ ६९३८ E-mail: itdept@maa.ac.in

जा.क्र. राशैसंप्रपम /आय.टी /दरपत्रक /२०२१ / ३३१६ दिनांक : ०६.१०.२०२१

# दरपत्रक सूचना

**विषय : राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे ३० या कार्यालयास दर्जेदार ई- साहित्य निर्मिती साठी आवश्यक साहित्य खरेदी करण्यासाठी दरपत्रके मिळणेबाबत...**

राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे हे शासकीय कार्यालय ७०८, कुमठेकर मार्ग, पुणे ३० येथे कार्यरत आहे. राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे ही शिक्षण विभागाची शिक्षक प्रशिक्षणाची शिखर संस्था आहे. सदरच्या कार्यालयामार्फत विद्यार्थी शिक्षणाच्या दृष्टीने विविध उपक्रम राबविले जात आहेत. यानुसारच अभ्यासक्रमावर व संदर्भीय साहित्यावर आधारित दर्जेदार ई- साहित्य निर्मितीसाठी खालील तपशिलाप्रमाणेचे साहित्य खरेदी करावयाचे आहे.

| अ.क्र. | आवश्यक साहित्य तपशील | स्पेसिफिकेशन | संख्या |
|---|---|---|---|
| १ | Apple MacBook Air M1 | Apple M1 Chip, 8 GB RAM, 256 GB SSD. Model Number A2337 | ६ |
| २ | Apple MacBook Pro | 16 Inch, 16 GB RAM,512 GB Storage,2.6 GHz,9th Gen Intel Core i7 | १ |
| ३ | Blue microphone Yeti USB | Mic of recording, 3 Condenser Capsule, 4 Pickup Patterns. | ६ |
| ४ | WACOM Tablet 8.5 Inch | WACOM One by CTL- 671/K0-CX Medium 8.5 Inch × 5.3 Inch Graphic tablet | ६ |

| | | | |
|---|---|---|---|
| ५ | Tag My Pointer Pro | | ६ |
| ६ | Camtasia licenses (Software) | | ६ |
| ७ | Sketchbook Software | | ६ |
| ८. | Type C to USB Adapter | | ६ |
| ९ | Hp Desktop DP1118 | | १ |
| १० | Brother Wireless Colour LED 3-in-One Duplex Mobile Print ADF | Colour LED 3-in-One Duplex MobilePrint ADF | १ |

**<u>पात्रता, अटी व शर्ती</u>**

उक्त नमूद तपशिलानुसारचे साहित्य खरेदी करण्यासाठी खालील अटीशर्तींच्या अनुषंगाने पुरवठादार संस्थांमार्फत दरपत्रके मागविण्यात येत आहे.

१. दरपत्रक सादर करत असताना दर अक्षरी व अंकी नमूद करावेत. त्यामध्ये खाडाखोड असू नये.
२. नमूद केलेले दर हे सर्व करासहित आकारलेले असावे.
३. एकूण रकमेवर नियमानुसार या कार्यालयामार्फत टी.डी.एस.आकारला जाईल.
४. साहित्य पुरावठा झाल्यानंतर त्याचे मूळ देयक (जी.एस.टी. सह) दोन प्रतीत कार्यालयास सादर करावे.
५. दरपत्रक धारकाकडे (Shop Act License) असणे आवश्यक आहे. त्याची एक प्रत दरपत्रकासोबत जोडावी.
६. दरपत्रकासोबत पॅनकार्डची सत्यप्रत सादर करावी.
७. उपरोक्त अटी व शर्ती शिथिल करण्याचा तसेच कोणतेही दरपत्रक कोणतेही कारण न देता नाकारण्याचा अधिकार, संचालक, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे यांनी राखून ठेवलेला आहे.
८. केवळ पुणे शहर व परिसरातील पुरवठादार यांनीच सदरची दरपत्रके सादर करावीत.
९. साहित्य पुरवठ्यानंतर सर्व साहित्य दिलेल्या स्पेसिफिकेशन प्रमाणे असल्याची तपासणी करून देयक अदा केले जाईल.

सदरच्या दरपत्रकामध्ये भाग घेण्यासाठी इच्छुक सेवापुरवठादरांनी सर्व करांसहित दर स्वतंत्ररीत्या संस्थेच्या लेटरहेड वर नमूद करून स्वतंत्र सीलबंद लखोटा / पाकीट सादर करावयाचे

आहे. बंद पाकिटावर **“साहित्य खरेदी बाबतचे दरपत्रके”** असे ठळक अक्षरात नमूद करावे. न्यूनतम दराच्या आधारे संस्था / पुरवठादाराची निवड करण्यात येईल.

उपरोक्त नमूद सर्व दरपत्रकाचा सीलबंद लखोटा / पाकीट “ संचालक, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र या शासकीय कार्यालय ७०८, सदाशिव पेठ, कुमठेकर मार्ग , पुणे-३० यांच्या नावे दिनांक १४ .१०.२०२१ रोजी सायंकाळी ४:०० वाजेपर्यंत कार्यालयात हस्तपोहोच पोहचेल अशा रीतीने पाठविण्यात यावे. मुदतीनंतर आलेल्या दरपत्रकांचा विचार केला जाणार नाही.

(विकास गरड)
उपसंचालक (आय.टी. व प्रसार माध्यम)
राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद,
महाराष्ट्र, पुणे.

<u>प्रत प्रसिद्धीसाठी सुचनाफलकावर तातडीने लावण्यासाठी सादर.</u>

१. मा.आयुक्त (शिक्षण), आयुक्त शिक्षण यांचे कार्यालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
२. माध्यमिक व उच्च माध्यमिक संचालनालय, महाराष्ट्र राज्य.
३. प्राथमिक शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य.

<u>माहिती व आवश्यक कार्यवाहीस्तव</u>

- सहाय्यक संचालक (लेखा), प्रस्तुत कार्यालय